Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २०३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. ११ सप्टेंबर २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## इथेनॉल मिश्रित इंधनाच्या वापरावर ‘माझ्या विरोधात राजकीय मोहीम’: नितीन गडकरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नवी दिल्ली**

ई ट्वेण्टी इंधन अर्थात २० टक्के इथेनॉल मिश्रित इंधनाच्या वापरामुळे वाहनाच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत आहे, अशी टीका सोशल मीडियातून काही दिवसांपासून होत आहे. या टीकेला केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी आज पुन्हा एकदा उत्तर दिले. तसेच ई ट्वेण्टीच्या वापरावरून माझ्याविरोधात पैसे देऊन राजकीय मोहीम चालवली जात असल्याचेही गडकरी यांनी सांगितले. सर्वोच्च न्यायालयाने नुकतीच ई ट्वेण्टी इंधन अंमलबजावणी कार्यक्रमाला आव्हान देणारी याचिका फेटाळली होती.

तसेच नवे वाहन खरेदी करताना जुने वाहन विकायला काढल्यास त्यावरील जीएसटी माफ करण्यात यावा, अशी विनंती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांना करणार असल्याचेही गडकरी यांनी सांगितले. असा निर्णय झाल्यास ग्राहक आणि संबंधित क्षेत्राला याचा मोठा फायदा होईल, असे ते म्हणाले.ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरर्स सोसायटीच्या ६५ व्या वार्षिक अधिवेशनात केंद्रीय नितीन गडकरी यांना ई ट्वेण्टी वापराबाबतचा प्रश्न विचारण्यात आला होता. याचे उत्तर देत असताना गडकरी यांनी त्यांच्याविरोधात पैसे देऊन मोहीम चालवली जात असल्याचा आरोप केला.




नितीन गडकरी यांनी या अधिवेशनात बोलताना म्हटले, ऑटोमोबाईल उत्पादक आणि ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया सारख्या संस्थांनी इथेनॉल मिश्रित पेट्रोल वापरण्यासंदर्भात त्यांची निरीक्षणे नोंदविली आहेत. तुमचे (ऑटोमोबाइल) क्षेत्र ज्या प्रकारे काम करते, त्याप्रकारेच आमचे (राजकीय) क्षेत्रही काम करते. मला राजकीयदृष्ट्या लक्ष्य करण्यासाठी माझ्याविरोधात पैसे देऊन सोशल मीडिया मोहीम राबवली गेली. इथेनॉलच्या वापराबाबत कोणतीही शंका-कुशंका नाही. इथेनॉलचा वापर किफायतशीर आणि प्रदूषणमूक्त आहे.

आपण २२ लाख कोटी रुपये इंधन आयात करण्यासाठी खर्च करतो. पंतप्रधान मोदींचे स्वप्न आहे की, आपला भारत स्वावलंबी झाला पाहिजे. अर्थव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून जर हेच २२ लाख कोटी रुपये वाचणार असतील तर हे आपण करायला नको का?, असा प्रश्न गडकरी यांनी उपस्थित केला.

गडकरी पुढे म्हणाले की, आम्ही मक्यापासून इथेनॉल तयार करण्याचा निर्णय घेतल्यानंतर भारतातील शेतकऱ्यांचा ४५ हजार कोटी रुपयांचा फायदा झाला. मक्याला १२०० रुपये क्विंटल दर मिळत होता, आज २८०० रुपये क्विंटलला दर मिळत आहे. आपल्याकडे तांदूळ, गहूदेखील अतिरिक्त होत आहे. त्यापासूनही इथेनॉल तयार होत आहे. त्यामुळे इथेनॉल शेतकऱ्यांच्या फायदेचच आहे.

**इथेनॉलमुळे प्रदूषण घटेल**

इथेनॉलचे फायदे सांगताना गडकरी म्हणाले की, यामुळे प्रदूषण कमी होण्यातही मदत होत आहे. सध्या संपूर्ण जगात प्रदूषणाची समस्या जाणवत आहे. ब्राझीलमध्ये जी२० च्या परिषदेसाठी मी गेलो होतो. तिथे प्रदूषण कमी करण्यासाठी ठराव करण्यात आला. संपूर्ण जग यावर काम करत आहे. दिल्लीत प्रदूषणामुळे तेथील लोकांचे आयुष्य १० वर्षांनी कमी होईल, असा एक अहवाल समोर आला आहे. त्यामुळे इथेनॉल वापरल्यास आपण प्रदूषणावर नियंत्रण मिळवू शकतो.

## भंडाऱ्याचे काँग्रेस खासदार प्रशांत पडोळेंच्या गाडीचा भीषण अपघात

### ट्रकची धडक, चौघांना किरकोळ दुखापत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११भंडारा**

भंडारा-गोंदियाचे खासदार डॉक्टर प्रशांत पडोळे यांच्या कारचा आज भीषण अपघात झाला. दिल्लीहून नागपूरला ते विमानाने आले होते. तेथून मतदारसंघात येत असताना कारला उमरेड बायपासजवळ ट्रकची जोरदार धडक बसली. यामध्ये पडोळे यांच्यासह इतरांना किरकोळ दुखापत झाली आहे.



पडोळेंना आणण्यासाठी कारने त्यांचे पीए यश पाटील, वाहन चालक राहुल गिऱ्हेपुंजे व खासदारांचा मित्र गिरीश रहांगडाले असे तिघे नागपूरला गेले होते. पडोळे यांना घेऊन ते नागपूर - भंडारा या राष्ट्रीय महामार्गावरून परतीच्या प्रवासाला निघाले होते. यावेळी हा अपघात झाला.

भंडाऱ्याकडे येत असताना उमरेड बायपासवर एका ट्रकने जोराची धडक दिली. यात पडोळेंच्या गाडीच्या पुढच्या भागाचा चक्काचूर झाला. भंडारे यांच्या डोक्याला मागील बाजुला मार लागला होता. प्रथमोपचारानंतर त्यांना सोडून देण्यात आले.

## भारत-पाकिस्तान सामना रद्द करण्यास सर्वोच्च न्यायालयाचा स्पष्ट नकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नवी दिल्ली**

येत्या १४ सप्टेंबरला दुबईमध्ये होणाऱ्या भारत-पाकिस्तान टी-२० क्रिकेट सामन्यावर बंदी घालावी, यासाठी दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुप्रीम कोर्टाने सुनावणी करण्यास नकार दिला आहे. सामना होऊ द्या. आम्ही कोणतीही बंदी घालणार नाही, असे कोर्टाने स्पष्टपणे सांगितले आहे.



चार एलएलबी (कायद्याच्या) विद्यार्थिनींनी, उर्वशी जैन यांच्या नेतृत्वाखाली याबाबत याचिका दाखल केली होती. त्यांनी याचिकेत पहलगाम येथील अतिरेकी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरचा संदर्भ देत पाकिस्तानविरुद्ध सामना खेळणे राष्ट्रीय भावना आणि प्रतिष्ठेचा अपमान असल्याचे म्हटले होते.

गुरुवारी (११ सप्टेंबर २०२५) कोर्टात तातडीच्या सुनावणीसाठी अर्ज करण्यात आला होता. भारत-पाकिस्तान सामना १४ सप्टेंबरला दुबई इंटरनॅशनल क्रिकेट स्टेडियमवर होणार आहे. हे प्रकरण न्यायमूर्ती जे. के. महेश्वरी आणि न्यायमूर्ती विजय बिश्नोई यांच्या खंडपीठासमोर मांडण्यात आले.

याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी कोर्टास विनंती केली की, सामना रविवारचा असल्याने, याचिका शुक्रवारपर्यंत यादीत घ्यावी. मात्र, कोर्टाने स्पष्टपणे सांगितले की, सामना रोखण्याचा आमचा कोणताही विचार नाही. पुन्हा विनंती केल्यानंतरही कोर्टाने सुनावणी घेण्यास नकार दिला आहे.

**सामना ठरल्याप्रमाणेच होणार**

१४ सप्टेंबरला दुबईमध्ये होणारा भारत-पाकिस्तान टी-२० एशिया कप क्रिकेट सामना नियोजित वेळापत्रकाप्रमाणे होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे या सामन्यावर कोणताही कायदेशीर अडथळा उरलेला नसल्याचे दिसून येत आहे.

## मराठा आंदोलनानंतर आता ओबीसींचा मोर्चा मुंबईत धडकणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११मुंबई**

काही दिवसापूर्वी मुंबईतील आझाद मैदानात मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी आंदोलन केले होते. या आंदोलनासाठी राज्यभरातून मोठ्या प्रमाणात मराठा समाज मुंबईत दाखल झाला होता. ऐन गणेशोत्सवात मुंबईत मोर्चा झाला. यानंतर मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भातील आठ मागण्यांपैकी सहा मागण्या राज्य सरकारने मान्य करत त्यासंदर्भात शासन निर्णय जारी केला. या जीआरला ओबीसी समाजाकडून विरोध सुरू झाला आहे. दरम्यान, आता लवकरच ओबीसी समाजाकडून मुंबईत मोर्चा काढणार असल्याची माहिती समोर आली आहे.



ओबीसी समाजाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. दसऱ्यानंतर ओबीसी समाजाकडून मोर्चा निघणार आहे. हा मोर्चा ८ किंवा ९ ऑक्टोबर रोजी निघणार असल्याचे बोलले जात आहे. याबाबत ओबीसी नेत्यांच्या बैठका झाल्याचे सांगण्यात येत आहे. मराठा समाजाला दिल्या जाणाऱ्या कुणबी प्रमाणपत्रांमुळे ओबीसी आरक्षण धोक्यात येईल, अशी शंका व्यक्त करण्यात येत आहे. या मोर्चाबाबत अंतिम निर्णय आज बैठकीत होणार आहे. मंत्री छगन भुजबळ आज या बैठकीत ऑनलाइन उपस्थित राहणार असल्याचे बोलले जात आहे. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारचे कौतुक करतानाच, धोका दिल्यास सोडणार नाही, असा स्पष्ट इशारा मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. विखे पाटील चांगले काम करत आहेत आणि मराठ्यांच्या हितासाठी जो मंत्री झटून काम करेल, त्याच्यासाठी मराठा समाज कायम उभा राहील, असेही ते म्हणाले.आज होणाऱ्या मराठा उपसमितीच्या बैठकीबद्दल माध्यमांशी बोलताना जरांगे पाटील यांनी अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर भाष्य केले. एकनाथ शिंदे साहेब आणि देवेंद्र फडणवीस साहेब चांगले काम करत आहेत. पण, आम्हाला धोका दिल्यास आम्ही सोडणार नाही, हे तितकेच खरे आहे, असे ते म्हणाले.

## नेपाळमधील वाद थांबेना, आता एकमेकांशी भिडले आंदोलक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११काठमांडू**

नेपाळमध्ये भ्रष्टाचार आणि सोशल मीडियावरील बंदीविरोधात पेटून उटलेल्या Gen-Z आंदोलकांनी तीव्र आंदोलन करत देशाच्या पंतप्रधानांना राजीनामा देण्यास भाग पाडले होते. मात्र त्यानंतरही नेपाळमधील तणावपूर्ण परिस्थिती अद्याप निवळलेली नाही. सध्या नेपाळमध्ये काळजीवाहू सरकार स्थापन करण्यासाठी हालचाली सुरू आहेत. तसेच त्यासाठी काही नावांवर चर्चा सुरू आहे. मात्र याचदरम्यान, Gen-Z मधील दोन गट आमने सामने येऊन भिडल्याची घटना घडली आहे.

दरम्यान, ऋशप-न आंदोलकांनी भारतीय प्रसारमाध्यमांना या भागातून जाण्याची सूचना दिली आहे. Gen-Zच्या एका गटाने पंतप्रदानपदासाठी सुशील कार्की यांना पाठिंबा दिला आहे. तर दुसऱ्या गटाने कुलमन घिसिंग यांना हंगामी सरकारचं प्रमुख करण्याची मागणी केली आहे. तसेच त्यांच्या नावाचा प्रस्तावरही एका गटाने दिला आहे.

## मोहन भागवत ७५ : वाढदिवसानिमित्त श्री श्री रविशंकर यांनी केलं सरसंघचालकांचं अभिष्टचिंतन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नागपूर**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ म्हणजेच आरएसएसचे सरसंघचालक मोहन भागवत यांचा गुरूवारी वाढदिवस. संघाच्या लाखो स्वयंसेवकांसाठी ऊर्जा आणि प्रेरणा देणारे डॉ. मोहन भागवत आज ७५ वर्षांचे झाले. त्यांच्या अमृत महोत्सवानिमित्त आध्यात्मिक गुरु श्री श्री रविशंकर यांनी मोहन भागवत यांचं अभिष्टचिंतन केलं. श्री श्री रविशंकर ३ दिवसांच्या नागपूर दौऱ्यावर आहेत. यादरम्यान त्यांनी सरसंघचालक मोहन भागवत यांचं 'नंदी'ची मूर्ती भेट देऊन अभिष्टचिंतन केलं.



देवाची भक्ती आणि देशभक्ती हे जरी वेगवेगळे विषय वाटत असले तरीही ते भारतात वेगवेगळे नाहीत. देवाची भक्ती करणारा देशभक्ती पण करतोच. प्रामाणिकपणे देशभक्ती करतो त्याच्याकडून ईश्वर भक्ती पण करवून घेतो. भारत देशाला प्राचीन इतिहास आहे. तसंच भगवान शिवशंकर आदीगुरू आहेत. सर्वांमधील ते मूळ तत्व आहेत. जगण्याचे १०८ मार्ग शिकवणारे भगवान शिव होते, असं सरसंघचालक मोहन भागवत 'महारुद्रपूजन' सोहळ्यात म्हणाले.

सत्संगमध्ये ईश्वराची अनुभूती होते. सर्वच ठीक असताना हसणं ही मोठी बाब नाही. तर काही ठीक नसताना हसत राहणं महत्त्वाचं आहे. देवाची भक्ती आणि देशभक्ती एका नाण्याचा दोन बाजू आहेत. नागपूर हे देशभक्तीचं केंद्र आहे. मोहन भागवत कर्मनिष्ठ आहे. सातत्यानं समाज आणि धर्मसाठी समर्पित आहे. आजही करोडो लोक देशभक्तीचं काम करत आहेत. संघ भारताची संस्कृतीच्या धरोवर जतन करण्याचं काम १०० वर्षांपासून करत आहे, असं मोहन भागवत म्हणाले.

## बिनशर्ट म्हणता म्हणता त्यालाच बिनशर्त तीनदा भेटले

### भाजपचा उद्धव ठाकरेंवर घणाघात; मशालीला इंजिनाचे वंगण फासल्याचा टोला

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.११मुंबई**

बिनशर्ट, बिनशर्ट म्हणता म्हणता त्यालाच बिनशर्त तीनदा भेटले, अशा शब्दांत भाजपने गुरूवारी राज ठाकरे यांची वारंवार भेट घेणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला. उद्धव ठाकरे केवळ आणि केवळ सत्तेच्या खुर्चीसाठी आपल्या मशालीला इंजिनाचे वंगण फासत असल्याची टीकाही भाजपने या प्रकरणी ठाकरे गटावर निशाणा साधताना केली आहे.

मनसेने आपला एकही उमेदवार उभा न करता लोकसभा निवडणुकीत भाजपला बिनशर्त पाठिंबा दिला होता. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी गतवर्षीच्या दसरा मेळाव्यात राज ठाकरेंवर केवळ मला विरोध करण्यासाठी काहींनी भाजपला बिनशर्ट पाठिंबा दिल्याची तिखट टीका केली होती. निवडणुकीत आपले कोण व परके कोण हे स्पष्ट झाले आहे. उद्धव ठाकरे नको म्हणून काही लोकांनी उघडपणे म्हणजे बिनशर्ट पाठिंबा दिला, असे ते म्हणाले होते. पण आता बदलत्या राजकीय समीकरणांत राज व उद्धव ठाकरे एकत्र आलेत. हे दोघे बंधू वारंवार एकमेकांच्या भेटी घेऊन पुढील रणनीती ठरवत आहेत.




**मशालीला इंजिनाचे वंगण**


या पार्श्वभूमीवर भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी वरील शब्दांत उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. बिनशर्ट, बिनशर्ट म्हणता म्हणता त्यालाच बिनशर्त तीनदा भेटले. केवळ आणि केवळ सत्तेच्या खुर्चीसाठी आता मशालीला इंजिनाचे वंगण फासले, असे त्यांनी म्हटले आहे. त्यांच्या या टीकेची महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे उद्धव ठाकरे यांनी काल म्हणजे बुधवारी राज ठाकरे यांची त्यांच्या घरी जाऊन भेट घेतली. या भेटीत त्यांच्यासोबत खासदार संजय राऊत व अनिल परब हे ही होते. अनिल परब यांना ठाकरे गटाचे मुंबईतील रणनीतीकार मानले जाते. त्यामुळे ठाकरे बंधूंच्या या भेटीत ठाकरे गट व मनसेच्या संभाव्य आघाडीची रुपरेषा ठरल्याचा दावा केला जात आहे.

## महाराष्ट्राच्या राज्यपालपदाची जबाबदारी आता गुजरातच्या राज्यपालांकडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११मुंबई**

भारताच्या उपराष्ट्रपतीपदी निवडून आलेल्या सीपी राधाकृष्णन यांनी महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळेच आता, राष्ट्रपतींनी गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांना महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवला आहे.



आचार्य देवव्रत गुजरातसह महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचाही कार्यभार सांभाळतील.राष्ट्रपती भवनाने दिलेल्या माहितीनुसार, सीपी राधाकृष्णन उद्या, म्हणजेच १२ सप्टेंबर २०२५ रोजी देशाचे १७ वे उपराष्ट्रपती म्हणून शपथ घेणार आहेत. राष्ट्रपती आणि सर्व मंत्र्यांच्या उपस्थितीत हा शपथविधी सोहळा पार पडेल.

**संपादकीय ......**

# राजकीय फायद्याला प्राधान्य की ठाकरी ठामपणा?

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी सर्व राजकीय पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. भाजपने तर आशिष शेलार यांच्या जागी अमित साटम यांच्याकडे मुंबई अध्यक्षपदाची जबाबदारी दिली आहे तर एकनाथ शिंदे यांनी २१ पदाधिकार्यांची समिती तयार केली आहे. उद्धव ठाकरेंना मुंबईत पराभूत केले म्हणजे ठाकरेंची मुंबईतील ताकद संपेल आणि शिवसेना संपणार, असे साधे गणित आहे. तर मुंबई महापालिका पुन्हा जिंकायचीच, असा निर्धार ठाकरेंच्या शिवसेनेने केला आहे. म्हणूनच मराठीच्या मुद्द्यावरून ठाकरे बंधू एकत्र आले आहेत. विशेष म्हणजे बुधवारी (१० सप्टेंबर) सव्वा दोन तास उद्धव ठाकरे यांनी शिवतीर्थवर राज ठाकरे यांच्याशी चर्चा केली. २० वर्षांत दोन्ही भाऊ एकमेकांच्या घरी कधीही गेले नव्हते. मात्र, ५ जुलैपासून १० सप्टेंबरपर्यंत उद्धव आणि राज या ठाकरे बंधूंची चारवेळा जाहीर भेट झाली आहे. याचा अर्थ काय, हे वेगळे सांगण्याची कुणाला गरज नाही. राज ठाकरे आपल्यासोबत असावेत ही भाजपची इच्छा होती आणि आहे. मात्र, त्यांचे ठाकरी विचार भाजपला परवडत नाहीत. त्यामुळे राज ठाकरे यांना आपले म्हणत त्यांना भाजपने कायम दोन हात दूर ठेवले. म्हणजे किमान त्यांचा उपद्रव नको, एवढे अंतर ठेवले आहे. तर एकनाथ शिंदे यांनाही राज ठाकरे त्यांच्याकडे हवे आहेत. मात्र, माहीम विधानसभा निवडणुकीत 'राज'पुत्र अमित ठाकरे यांच्यासाठी एकनाथ शिंदे यांनी त्यांचा उमेदवार मागे घेतला नाही. त्यामुळे अमित ठाकरेंचा पराभव राज ठाकरेंच्या वर्मी लागला आहे. मात्र, यावर त्यांनी कधीही वक्तव्य केले नाही.

अखेर पहिल्या इयत्तेपासून हिंदी भाषा सक्तीविरोधातील आंदोलनाच्या निमित्ताने दोन्ही भाऊ एकत्र आले. ते एकत्र येऊ नयेत म्हणून त्यांच्या जाहीर सभेआधीच सरकारने हिंदी सक्तीचे जीआर रद्द करण्याची हुशारी दाखवली खरी मात्र, उपयोग झाला नाही. कारण दोघेही एकत्र आले. एकदा नाही तर त्यानंतर तीनवेळा भेटलेही. हे सर्व सांगण्याचे कारण म्हणजे मुंबई महापालिकेत ठाकरे बंधूंना रोखण्याचे प्रयत्न सुरू आहेत आणि दोघेही सर्वांना पुरून उरत असल्याचे सध्याचे तरी चित्र आहे. एकनाथ शिंदे यांनी जून २०२२ मध्ये बंडखोरी केली आणि शिवसेनेचे ४० आमदार फोडले. त्याचवर्षी उद्धव ठाकरे यांचे बंधू जयदेव ठाकरे यांनी शिवसेनेच्या दसर्या मेळाव्यात एकनाथ शिंदेंची भेट घेतली. उद्धव ठाकरे यांच्या वहिनी स्मिता ठाकरे यांनी मुख्यमंत्री झालेल्या एकनाथ शिंदे यांचे अभिनंदन केले होते. तर उद्धव ठाकरे यांचे पुतणे निहार ठाकरे एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेले होते. एवढेच नाही तर बाळासाहेब ठाकरे यांचे मदतनीस चंपा सिंह थापा यांनीही शिंदेंना साथ दिली. तेव्हा ठाकरे कुटुंब आपल्यासोबत असल्याचा दावा एकनाथ शिंदेंकडून केला जात होता.

आज एकनाथ शिंदे यांच्यासोबत असलेले हे ठाकरे कुठे आहेत, याचा कुणालाच पत्ता नाही. मात्र, उद्धव ठाकरे यांना मुंबईत पराभूत करायचे असेल राज ठाकरे आपल्याकडे हवेत, याची सर्वांना जाणीव आहे. म्हणूनच त्यांना आपल्याकडे वळवण्याचे सर्वांचे प्रयत्न सुरू आहेत. यावरून खरे ठाकरे कोण, याची जाणीव एकनाथ शिंदे यांना झाली आहे, यात खूप काही आले. आजही ठाकरेंचा शब्द चालतो, त्यांना मानणारे बहुसंख्य लोक आहेत, याचा विसर भाजपला अजिबात झालेला नाही. म्हणूनच उद्धव ठाकरेंना कोंडीत पकडण्याचे त्यांचे प्रयत्न आहेत. त्यासाठी राज ठाकरेंना भाजपकडे खेचण्याचे हरतर्हेने प्रयत्न झाले. मात्र, राज ठाकरे कुणालाही बधले नाहीत. मैत्री वेगळी आणि राजकारण वेगळे यातील स्पष्ट रेष त्यांनी ओळखली. म्हणूनच राज ठाकरे त्यांचा आब राखून आहेत. राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच मंत्र्यांना शिवतीर्थावर यावे लागते, यातून राज ठाकरेंचे राजकीय महत्त्व अधोरेखित होते. आता हे दोन्ही बंधू एकत्र असल्यामुळे त्यांच्या आत्मविश्वासाला तडा लावण्यासाठी शिवसेना तसेच भाजपकडून प्रयत्न सुरू आहेत. दोन्ही भाऊ एकत्र आल्याने आम्हाला काहीही फरक पडत नसल्याचे वारंवार सांगत आहेत. याचाच राजकीय अर्थ फरक पडतो, असा होतो. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतील बहुसंख्य माजी नगरसेवकांना एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या पंखाखाली घेतले आहे. भाजपनेही त्यांची ताकद वाढवली आहे. अशा परिस्थितीत उद्धव ठाकरे यांची शिवसेना अडचणीत आली आहे. अनेक आमदार, खासदार, नगरसेवक, पदाधिकारी तसेच कार्यकर्ते यांनी उद्धव ठाकरेंची साथ सोडली आहे. तर राज ठाकरे यांचा एकही आमदार नाही किंवा त्यांची एकाही पालिकेवर सत्ता नाही. त्यामुळे दोघे एकत्र आल्यास दोघांच्या पक्षांना मोठा आधार मिळेल, असा विचार त्यांनी केला असेल तर त्यात वावगे काय? दोन्ही नेत्यांनी एकमेकांची राजकीय सोय पाहिली आहे. मनसे आणि ठाकरेंची शिवसेना हे दोन्ही स्थानिक राजकीय पक्ष आहेत. भाजपचे प्राबल्य असलेल्या राज्यात दोन्ही पक्ष वाढावेत असे वाटत असेल तर दोघांनी एकत्र येण्याची आणि एकत्र राहण्याची गरज आहे.






## कधीही होणार नाही हृदयविकाराचा त्रास; खाण्यासाठी वापरा हे तेल

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक**

तेलाशिवाय कोणताही पदार्थ बनत नाही. फास्ट फूड, तळणीचे पदार्थ किंवा अगदी रोजच्या स्वयंपाकात तेलाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. मात्र मर्यादेपेक्षा जास्त तेलाचा वापर आरोग्यासाठी घातक ठरू शकतो. जास्त तेल वापरल्याने हृदयविकाराचा धोका वाढतो. त्यामुळे अन्नपदार्थांच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवणारी देशातील सर्वात मोठी संस्था, ऋडड-ख ने तेलाच्या वापराबाबत काही महत्त्वाची माहिती दिली आहे. या संस्थेच्या मते, बहुतेक लोक हे आपण रोज किती तेल वापरतो, कोणत्या प्रकारचे तेल वापरतो याकडे लक्ष देत नाहीत. यामुळेच तेलाचा जास्त आणि चुकीचा वापर होत असल्याने आरोग्यावर वाईट परिणाम होत आहेत.

आता नेमके कोणते तेल खाण्यासाठी योग्य असते? किंवा तेलाचा किती प्रमाणात वापर करावा? हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. खरे तर, निरोगी हृदयासाठी नेहमी पॅक केलेले तेल वापरणे चांगले असते. तसेच एकदा वापरलेल्या तेलाचा पुनर्वापर करताना काळजी घेणे महत्वाचे आहे. नाही तर यामध्ये विषारी घटक तयार होऊ शकतात. प्रत्येक तेलाचा एक ठराविक स्मोक पॉईंट असतो त्यापेक्षा जास्त तेल गरम केल्यास त्याची गुणवत्ता घटते.

**पॅक केलेले तेल वापरा**

पॅक केलेले कुकिंग ऑइल म्हणजे काय असा तुम्हाला प्रश्न पडेल. तर अगदी सोपे आहे बाजारात मिळणारे तेलाचे पाऊच, बाटल्या, कॅन किंवा टिनमध्ये भरून विकले जाणारे तेल, जसे की रिफाइंड, मोहरी, सोयाबीन किंवा सूर्यफूल तेल. हे तेल स्वयंपाकासाठी वापरावे कारण ते सुरक्षित, स्वच्छ आणि सोयीस्कर असते रिफायनिंग आणि गुणवत्ता चाचण्यांच्या प्रक्रियेतून हे तेल तयार केले जाते. त्यामुळे सुट्टे तेल घेण्यापेक्षा हे तेल खाण्यासाठी वापरावे.

**तेलाचा पुनर्वापर करण्याची पद्धत**

आता FSSAI या संस्थेने एकदा वापरलेले तेल पुन्हा न वापरण्याचा सल्ला दिला असला तरी ते फेकण्याची इच्छा होत नाही. मग अशा वेळी वापरलेले तेल पूर्णपणे गाळून स्वच्छ काचेच्या डब्यात ठेवा. यानंतर तुम्ही ते वापरू शकता. लक्षात ठेवा एकदा वापरलेले तेल २ ते ३ दिवसांपेक्षा जास्त दिवस वापरू नये.

**जास्त तेलामुळे होणारे नुकसान**

जेवणात जास्त तेलाच्या वापरामुळे शरीराला मोठ्या प्रमाणात नुकसान होते. यामुळे लठ्ठपणा वाढतो कारण तेलात भरपूर कॅलरीज असतात. जास्त तेलामुळे कोलेस्टेरॉल वाढते आणि ब्लॉकेज, हार्ट अटॅक आणि स्ट्रोक सारख्या हृदयरोगांचा धोका वाढतो. तळलेले अन्न उच्च रक्तदाबास कारणीभूत ठरू शकते. तेलकट अन्न पचण्यास कठीण असते, ज्यामुळे गॅस, आम्लता, बद्धकोष्ठता आणि अपचन यासारख्या समस्या उद्भवतात. सतत जास्त तेल खाल्ल्याने त्याचा त्वचेवर आणि केसांवरही परिणाम होतो, ज्यामुळे मुरुमे, पुरळ आणि तेलकट त्वचेच्या समस्या उद्भवू शकतात.

# अमरावती शहराला स्वच्छ हवेचा मान, दूरदृष्टीचे 'सुनील पर्व' ठरले दिशादर्शक




अमरावती शहराला नुकताच स्वच्छ वायू सर्वेक्षणात देशात अव्वल ठरण्याचा मान मिळाला आणि या यशामागे दोन दशकांपूर्वी माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी घेतलेल्या दूरदृष्टीच्या निर्णयांचा मोठा वाटा असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. त्यांच्या आमदारकीच्या काळात त्यांनी राबवलेल्या धाडसी उपक्रमांमुळेच आज अमरावतीला देशातील सर्वाधिक स्वच्छ हवेचे शहर म्हणून ओळख मिळाली आहे.

**अतिक्रमणमुक्तीचा धाडसी निर्णय**

शहरातील वाढलेली अतिक्रमणे हटवणे हे एक मोठे आव्हान होते. लोकक्षोभ आणि संभाव्य परिणामांची पर्वा न करता डॉ. देशमुख यांनी हा धाडसी निर्णय घेतला. त्यांनी पुढाकार घेऊन शहर अतिक्रमणमुक्त केले. त्यामुळे शहराला आलेले बकाल स्वरूप दूर झाले, रस्ते प्रशस्त झाले आणि वाहतूक अधिक सुरळीत झाली. या निर्णयामुळे शहरवासीयांना सुरुवातीला त्रास झाला असला तरी, त्याचे दूरगामी सकारात्मक परिणाम आज आपण अनुभवत आहोत.अतिक्रमण हटवल्यानंतर मोकळ्या झालेल्या रस्त्यांच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले. या व्यापक वृक्ष लागवड मोहिमेमुळे शहरात एक हिरवेगार आच्छादन तयार झाले. या आच्छादनाने हवेची गुणवत्ता सुधारण्यास मोठा हातभार लावला. 'स्वच्छ शहर, हरित शहर' या संकल्पनेला त्यांनी त्यावेळी मूर्त स्वरूप दिले, ज्याचे फळ आता स्वच्छ वायू सर्वेक्षण २०२५ च्या रूपाने मिळाले आहे.

डॉ. सुनील देशमुख यांनी त्यांच्या कार्यकाळात घेतलेल्या अनेक निर्णयांचा लाभ अमरावती शहराला झाला आहे. शहरातील रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाची मुहूर्तमेढ त्यांच्याच कार्यकाळात रोवली गेली. रस्त्यांचे काँक्रीट्रीकरण झाल्यामुळे अमरावती शहर हे जवळपास धूळमुक्त झाले आहे. हवेची गुणवत्ता वाढली आहे. लोकांना मोकळा श्वास घेता येत आहेत. शहराचा विकास हा दूरदृष्टी ठेवून केला तर निश्चितपणे त्याचे फलित दिसून येते. डॉ सुनील देशमुख यांचे योगदान त्यामुळे मोलाचे ठरले आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने गोळा केलेल्या आकडेवारीनुसार, केंद्र सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने जाहीर केलेल्या 'स्वच्छ वायू सर्वेक्षण २०२५' मध्ये अमरावती शहराने ३ ते १० लाख लोकसंख्येच्या गटात २०० पैकी २०० गुण मिळवून देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे. याबद्दल शहराला ७५ लाख रुपये आणि प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात आले आहे. वायू गुणवत्ता, नागरिकांचा सहभाग, शाश्वत उपाययोजना आणि प्रशासनाची भूमिका अशा विविध निकषांवर आधारित या सर्वेक्षणात अमरावती अव्वल ठरले.

शहरातील विविध सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर लावलेली झाडे, रस्त्यांवरील धूळ कमी करण्यासाठी केलेले विशेष प्रयत्न, सार्वजनिक वाहतुकीसाठी पर्यावरपूरक साधनांचा वापर वाढवण्यावर भर, औद्योगिक भागातील प्रदूषण नियंत्रणासाठी केलेल्या विशेष उपाययोजना, हे घटक महत्वाचे ठरले आहेत.


डॉ. सुनील देशमुख यांनी दोन दशकांपूर्वी घेतलेल्या निर्णयामुळेच आज अमरावतीला हा बहुमान मिळाला आहे. हे 'सुनील पर्व' केवळ शहराला सौंदर्यच देत नाही, तर नागरिकांना शुद्ध हवा आणि आरोग्यपूर्ण जीवनशैली देण्यासही मदत करत आहे.



**सतीश काळे,**
**मो. ९४२१०४९१५१**

# ढगाळ, पावसाळी हवामानामुळे भात पिकात होऊ शकतो 'या' किडींचा प्रादुर्भाव; कसे कराल नियंत्रण?




**दि.११विदर्भ प्रजासत्ताक कृषी**

सध्या ढगाळ आणि पावसाळी हवामानामुळे भात पिकावर कीड-रोगांचा प्रादुर्भाव होण्यासाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे.यामुळे शेतकरी चिंतेत असून, भात पिकाची नियमित देखरेख आणि योग्य उपाययोजना करण्यासाठी शेतकऱ्यांनी कीड-रोग व्यवस्थापनासाठी तातडीने पावले उचलण्याचे सुचवले आहे.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

**पिकाची काळजी आणि उपाययोजना**

१) पाण्याचा निचरा

भात खाचरात साचलेले अतिरिक्त पाणी निचरा करावा.

पीक फुटवे येण्याच्या अवस्थेत पाण्याची पातळी ५ सें.मी. पर्यंत नियंत्रित ठेवावी.

बांधबंदिस्ती करून पाण्याचा योग्य निचरा करावा आणि खाचरातील, तसेच बांधावरील तण काढून टाकावे.

**२) किडींचे निरीक्षण**

भात पिकावर निळे भुंगेरे, सुरळीतील अळी आणि पाने गुंडाळणारी अळी यांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे.

यासाठी खाचरात पाणी खेळते ठेवावे आणि प्रत्येक २-३ दिवसांनी पाणी बदलावे.

या किडींच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन (५% प्रवाही) ०.५ मि.लि. प्रति लिटर पाणी किंवा कारटॅप हायड्रोक्लोराइड (५०% प्रवाही) १.२ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी.

फवारणी पावसाची ६ तास उघडीप असताना करावी.

**३) तपकिरी तुडतुड्याचा प्रादुर्भाव**

सध्याचे वातावरण तपकिरी तुडतुड्याच्या प्रादुर्भावासाठी अत्यंत पोषक आहे.

दाट लागवड, जास्त नत्र खतांचा वापर आणि खाचरात पाणी साठून राहणे यामुळे ही कीड वाढू शकते.

रोपाच्या चुडात ५-१० तुडतुडे आढळल्यास त्वरित उपाययोजना करावी.

नियंत्रणासाठी फिप्रोनिल (५% प्रवाही) २ मि.लि., इमिडाक्लोप्रिड (१७.८% प्रवाही) ०.२ मि.लि. किंवा थायामेथोक्झाम (२५% डब्ल्यूजी) ०.२ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी.

फवारणी करताना पावसाची ३-४ तास उघडीप असावी आणि फवारा चुडाच्या बुंध्यावर पडेल याची काळजी घ्यावी.

**४) खोडकिडीचे व्यवस्थापन**

खोडकिडीचा प्रादुर्भाव आढळल्यास पुनर्लागवडीनंतर ५ % कीडग्रस्त फुटवे किंवा एक चौरस मीटर क्षेत्रात एक अंडीपुंज आढळल्यास त्वरित उपाययोजना करावी.

यासाठी शेतात २०-२५ मीटर अंतरावर २० कामगंध सापळे लावावेत.

खोडकिडींच्या नियंत्रणासाठी ॲसिफेट (७५% पाण्यात विरघळणारे) ६२५ ग्रॅम, क्विनॉलफॉस (२५% प्रवाही) १२५० मि.लि., कारटॅप हायड्रोक्लोराइड (५०% प्रवाही) ६०० ग्रॅम किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन (५% प्रवाही) ५०० मि.लि. प्रति हेक्टरी फवारणी करावी.

फवारणी करण्याआगोदर कोणती कीटकनाशके कशी घ्यायची? एकत्रित मिक्स करता येतील का? फवारणी कशी करता येईल यासाठी शेतकऱ्यांनी जवळील कृषी विज्ञान केंद्राच्या तज्ञांचा सल्ला घ्यावा.

# दुचाकीसाठी नवीन वाहन मालिका सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ अमरावती**

परिवहनेत्तर दुचाकी संवर्गातील वाहनांसाठी नवीन वाहन मालिका सुरू करण्यात येणार आहे. यासाठी इच्छुकांनी मंगळवार, दि. १६ सप्टेंबर रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत पसंती क्रमांकाच्या डिमांड ड्राफ्टसह अर्ज परिवहन कार्यालयात जमा करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

पसंती क्रमांकासाठी वाहन नावावर असलेल्या व्यक्तीच्या अर्जासोबत त्यांच्या पत्त्याचा पुरावा, पॅन कार्ड जोडावे. तसेच अर्जामध्ये वाहन ज्या व्यक्तीच्या नावे आहे, त्या व्यक्तीचा आधारकार्डला संलग्न असलेला भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे. पसंती क्रमांक डिमांड ड्राफ्ट अमरावती, कॅम्प शाखा, ट्रेझरी ब्रांच कोड नं. ००३८६६ येथे देय असावा.

पसंती क्रमांकाची यादी दि. १६ सप्टेंबर रोजी ४ वाजता कार्यालयातील नोटीस बोर्डवर प्रदर्शित करण्यात येणार आहे. एकापेक्षा अधिक अर्ज आलेल्या अर्जदारांनी दि. १७ सप्टेंबर रोजी दुपारी १.३० वाजेपर्यंत पसंती क्रमांक शुल्काचा डिमांड ड्राफ्ट बंद लिफाफ्यात जमा करावेत. दुपारी ३ वाजता प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या दालनात डिमांड ड्राफ्ट अर्जदारासमोर उघडण्यात येतील, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी कळविले आहे.

# कौशल्य विकास केंद्राचा आज रोजगार मेळावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ अमरावती**

जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मोहिमे'चे गुरूवार, दि. ११ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजन करण्यात आले आहे. जगदंब महाविद्यालय, अचलपूर येथे हा मेळावा होणार आहे.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडल करिअर सेंटरतर्फे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्यामध्ये विविध कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्यातील युवकांना नोकरीच्या संधी मिळवून देण्यासाठी रोजगार मेळाव्यामधून प्रयत्न करण्यात येते. मेळाव्यात कोलब्रो गृप प्रा. लि., भारत फायनान्स प्रा.लि., स्विगी, जिनस पावर, क्वेज कॉर्पोरेशन प्रा. लि. पुणे, दामोधर इंडस्ट्रीज प्रा. लि., टाटा मोटर्स, पुणे, ग्रिनफॅब सोलर खादी, कोअर प्रोजेक्ट, धूत ट्रान्समिशन संभाजीनगर, जाधव गियर्स, स्पंदन मायक्रो फायनान्स ली., मेस्कोर प्रेसीजन प्रा. लि., क्रेडीट क्सीस ग्रा. लि., ब्लिंकीट प्रा. लि., तसेच विविध आस्थापना, कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहून उमेदवारांच्या थेट मुलाखती घेतील. मुलाखतीनंतर पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना नोकरीची संधी मिळणार आहे.

मेळाव्यामध्ये सहभागी होण्यासाठी ारहीुूरा.सीं.ळप या वेबसाईटवर ऑनलाईन नोंदणी करावी. यात ऑनलाईन सहभाग नोंदवून आपली रजिट्रेशनची प्रत काढून मेळाव्याच्या दिनांकास उपस्थित राहावे. याबाबत अडचणी असल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, दुरध्वनी क्रमांक ०७२१-२५६६०६६ किंवा amravatirojgargmail.com या मेलवर संपर्क साधावा. मेळाव्यासाठी बायोडाटा, पासपोर्ट साईज फोटो आणि आवश्यक कागदपत्रासह प्रत्यक्ष उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

# विदर्भ प्रजासत्ताक

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

गुरुवार दि. ११ सप्टेंबर २०२५

शहर/ग्रामिण

# अखेर शकुंतलेचे ग्रहण सुटले

## शकुंतला ब्रॉडगेज डीपीआरला मध्य रेल्वेची मंजुरी : सत्याग्रह समितीचा ऐतिहासिक विजय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अचलपूर**

सात दशकांहून अधिक इतिहास असलेल्या शकुंतला रेल्वेच्या ब्रॉडगेज रुपांतराच्या लढ्याला अखेर निर्णायक वळण मिळाले आहे. अचलपूर-मूर्तिजापूर मार्गाच्या ब्रॉडगेजसाठी डीपीआर (डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट) मंजूर झाल्याची अधिकृत माहिती मध्य रेल्वे प्रशासनाने दिली आहे. त्यामुळे शकुंतला रेल बचाव सत्याग्रह समितीचा सात वर्षांचा अहिंसक लढा आज ऐतिहासिक विजय ठरला आहे.




२०१८ पासून शकुंतला रेल बचाव सत्याग्रह समिती अचलपूर येथे कार्यरत असून, या काळात विविध आंदोलन, रस्तारोको, उपोषणे, जागरण यांसारख्या अहिंसक मार्गांनी शासनाचे लक्ष वेधण्यात आले. २०२२ मध्ये एफएलएस (फायनल लोकेशन सर्व्हे) मंजूर झाला होता. मात्र डीपीआर न झाल्यामुळे ब्रॉडगेजचे काम रखडले होते. समितीने हार न मानता सातव्या वर्षीही संघर्ष कायम ठेवला आणि अखेर यश पदरी पडले.

समितीचे प्रतिनिधी योगेश खानजोडे, डॉ. राजा धर्माधिकारी, विजय गोंडचवर, दयाराम चंदेले यांनी भुसावळ येथे मध्य रेल्वेचे महाप्रबंधक श्री. पुनीत अग्रवाल व मुख्य अभियंता (निर्माण) संदीप सिन्हा यांची भेट घेतली. या बैठकीत ब्रॉडगेज कामकाजाची सविस्तर माहिती देण्यात आली. त्यात प्रथम टप्प्यात अचलपूर-मूर्तिजापूर डीपीआर मार्गी लागल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. या निर्णयाचे समितीने स्वागत करून रेल्वे प्रशासनाचे आभार मानले.

शकुंतला रेल बचाव समितीच्या आंदोलनात अनेक सामाजिक व स्वयंसेवी संघटनांनी सातत्याने सहभाग नोंदवला. यामध्ये माहेर फाउंडेशन, आदिवासी पर्यावरण संघटन, संस्कार भारती, मानव सेवा समिति, क्रांती ज्योती संघटन, जमाते इस्लामिक हिंद संघटन, मराठा सेवा संघ, व्यापारी संघटन आदी विविध संस्थांचे योगदान राहिले.

गेल्या सात वर्षांच्या संघर्षात समितीतील शेकडो कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग दिला. त्यामध्ये योगेश खानजोडे, गजानन कोल्हे, डॉ. राजा धर्माधिकारी, राजेश अग्रवाल, दिपा तायडे, शारदा उइके, कमल केजरीवाल, राजकुमार बरडिया, वसंत धोबे, संजय डोंगरे, सुरेश प्रजापती, प्यारेलाल प्रजापती, रामदास मसने, दयाराम चंदेले, विजय गोंडचवर, संतोष नरेडी, राजेंद्र जायसवाल, दिपाली विधले, राजेश पांडे, किरण गवाई, मुरलीधर ठाकरे, शंकर बारखडे, किरण वडूरकर, बेबी वजाले, उज्वला माकोडे, डॉ. दीपक गुलहाने आदींचा विशेष सहभाग होता.

सात वर्षांचा संघर्ष, सातत्याची चिकाटी आणि शेकडो कार्यकर्त्यांचे अथक प्रयत्न यांचा परिपाक म्हणून शकुंतला रेल्वेच्या ब्रॉडगेज प्रकल्पाला आता प्रत्यक्ष गती मिळणार आहे. अचलपूर ते मूर्तिजापूर हा टप्पा मार्गी लागल्यामुळे पुढील काळात संपूर्ण प्रकल्प पूर्णत्वास जाण्याचा विश्वास समितीने व्यक्त केला आहे.गावोगावात या निर्णयाचे स्वागत होत असून शकुंतला रेल बचाव सत्याग्रह समितीचा विजय हा अचलपूरसह संपूर्ण मेळघाट-विदर्भासाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे.

# कौशल्य स्पर्धांमध्ये सहभागी व्हा, भविष्य घडवा - जिल्हाधिकाऱ्यांचे युवकांना आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

शांघाई येथे होणाऱ्या जागतिक कौशल्य स्पर्धेत सहभागी होण्याची संधी जिल्ह्यातील युवकांना मिळणार आहे. दर दोन वर्षांनी होणाऱ्या या स्पर्धेत युवकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.



जगातील सर्वात मोठी व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य उत्कृष्टता स्पर्धा होणार आहे. यात जगभरातील २३ वर्षाखालील तरुणांना ऑलिम्पिकच्या धर्तीवर कौशल्य सादर करण्याची स्पर्धा होणार आहे.

जागतिक स्तरावरील कौशल्य स्पर्धेच्या पूर्व तयारीच्या दृष्टीने ६३ क्षेत्राशी संबंधित जिल्हा व राज्यस्तरावर व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, सेक्टर स्किल कॉन्सील, विविध औद्यागिक आस्थापना यांच्या सहकार्याने स्किल कॉम्पीटीशन आयोजित करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हा, विभाग, राज्य आणि देश पातळीवर निवड केलेल्या उमेदवारांची नावे जागतिक नामांकनासाठी पाठविण्यात येणार आहे.

जागतिक कौशल्य स्पर्धेच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय कौशल्य स्पर्धेकरीता जागतिक कौशल्य स्पर्धेसाठी वयोमर्यादा हा एकमेव निकष ठरविण्यात आला आहे. सदर स्पर्धेमध्ये ५० क्षेत्रासाठी उमेदवाराचा जन्म दि. १ जानेवारी २००४ किंवा त्यानंतरचा असणे अनिवार्य आहे. तसेच, डिजीटल कन्स्ट्रक्शन, क्लाऊड कॉम्प्युटींग, सायबर सिक्युरिटी, आयसीटी नेटवर्क इन्फ्रास्ट्रक्चर, अॅडिटीव्ह मॅनुफॅक्चरिंग, इंडस्ट्रीअल डिझाईन टेक्नॉलॉजी, इंडस्ट्री ४.०, मॅकेट्रॉनिक्स, ऑप्टोइलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजी, रोबोट सिस्टीम इंटीग्रेशन, वॉटर टेक्नॉलॉजी, डेंटल प्रोस्टेथिक्स, एअरक्राफ्ट मेंटनन्स या क्षेत्राकरीता उमेदवाराचा जन्म दि. १ जानेवारी २००१ किंवा त्यानंतरचा असणे आवश्यक आहे.

शांघाई येथे आयोजित जागतिक कौशल्य स्पर्धेत प्रतिभासंपन्न, कुशल उमेदवारांचे नामांकन करण्याच्या दृष्टीने आयोजित स्पर्धेत सर्व कौशल्य प्रशिक्षण संस्थांनी स्पर्धेत सहभागी व्हावे. वर्ष २०२६ मधील जागतिक कौशल्य स्पर्धेसाठी इच्छुक पात्र उमेदवारांनी skillindiadigital.gov.in यावर दि. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत नाव नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी केले आहे.

# निधी वापरात जिल्हा परिषद अपयशी? १०७ कोटी खर्चाचे मोठे आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

मिनी मंत्रालय अर्थात जिल्हा परीषदेला विविध विभागाकडून निधी प्राप्त होता. मात्र पुन्हा एकदा हा निधी खर्च करण्यात जिल्हा परिषदेला अपयश आले आहे. जिपच्या विविध विभागांना प्राप्त झालेल्या निधीमधून केवळ ३१ टक्केच निधी या दिड वर्षात खर्च झाला आहे. निधी खर्च करण्याला आता शेवटचे सहा महिने शिल्लक राहिले आहे. त्यामुळे १०७.११ कोटी खर्च करण्याचे मोठे आव्हान जिल्हा परिषदेसमोर उभे ठाकले आहे.




जिल्हापरिषदेच्या सन २०२४-२५ च्या वार्षिक योजनेंतर्गत १७० कोटी ६५ लाख प्रस्तावित असताना जिल्हा परिषदेच्या विविधविभागांना १५७ कोटी १८ लाखांचा तरतूद निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. मात्र, जुनपर्यंत यातील केवळ ५० कोटी ६ लाख ८५ हजार इतकाच निधी खर्च झाला आहे. म्हणजेच दिड वर्षात एकूण निधीपैकी ३१.८५ टक्केच खर्च झाला आहे. मार्च २०२६ पर्यंत केवळ सहा महिनेच शिल्लक आहेत. त्यामुळे अवघ्या सहा महिन्यांत उर्वरित १०७ कोटी ११ लाख १७ हजारांचा निधी खर्च कसा करणार, याकडे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. काही विभागांनी मात्र बऱ्यापैकी निधी खर्च केला आहे. जिल्हा ग्रामिण विकास यंत्रनेचा सर्वाधिक शंभर टक्के निधी खर्च झाला आहे. त्या पाठोपाठ ग्रामिण पाणी पुरवठा विभागाने ५८ टक्के खर्च केला. परंतु काही विभागाचा टक्केवारी असमाधानकारक दिसून आली. यामध्ये आरोग्य विभाग १४ टक्के, शिक्षण २३ टक्के, कतिर्थक्षेत्र २१ टक्के निधी खर्च झाला आहे. महिला व बालकल्याण विभागाने २८.३३ टक्के, पंचायत विभागाने ३६.३४ टक्के इतका खर्च नोंदविला आहे. तर आरोग्य विभागाने १४.४१ टक्के व कृषी विभागाने अवघे ८.४६ टक्के निधी खर्च केल्याचे दिसून येते. आगामी जिल्हा परिषद निवडणुका डोळ्यासमोर असल्याने सहा महिन्यांत ६९ टक्के निधी खर्च करण्याचे मोठे आव्हान जिल्हा परिषदेच्या या विभागासमोर उभे ठाकले आहे.

# गुन्हेगारांची माहिती होणार डिजिटल व अचूक - मृतांची नोंद वगळण्याचे काम सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

शहरातील प्रत्येक गुन्हेगारांची माहिती गुन्हे शाखेत आहे. परंतु संबंधित गुन्हेगाराची सखोल माहिती नसल्यामुळे गुन्हे शाखेची विशेष चमू शहरातील प्रत्येक गुन्हेगारांची माहिती अपडेट करीत आहे. तसेच ज्या गुन्हेगाराचा मृत्यू झाला, त्यांची नावे या यादीतून कमी होणार आहेत.



महानगर पालिकेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी शहरातील प्रत्येक गुन्हेगारांची माहिती गोळा करून ती ऑनलाईन करण्याचे आदेश संबंधित विभागाला दिले आहेत. पोलीस आयुक्तांच्या आदेशानुसार गुन्हे शाखेची विशेष टिम शहरातील प्रत्येक गुन्हेगारांची माहिती गोळा करीत असून ऑनलाईन अपडेट करीत आहे. शहरातील प्रत्येक पोलीस ठाण्यात त्यांच्या हद्दीतील गुन्हेगारांची माहिती आहे. परंतु संबंधित माहिती ऑनलाईन नसल्यामुळे गुन्हेगारांचा शोध घेण्यास अडचणी निर्माण होतात. त्यामुळे प्रत्येक गुन्हेगारांची माहिती गोळा केली जात आहे. यामध्ये संबंधित गुन्हेगारावर किती गुन्हे आहेत, कोण आणि कोणत्या ठाण्यात किंवा जिल्ह्याबाहेर काही गुन्हे दाखल आहेत का, तसेच कोणते गुन्हे दाखल आहेत, पहिला गुन्हा कधी केला तसेच संबंधित गुन्हेगारांचे नातेवाईक कुठे-कुठे राहतात, तो काय कामधंदा करतो, आतापर्यंत किती प्रतिबंधक व तडीपार केले, त्याचे मित्र-मैत्रिणी कोण आहेत, मोबाईल नंबर, नुकताच काढलेला फोटो अशी संपूर्ण माहिती गोळा करून ऑनलाईन अपडेट करण्याची प्रकिया गुन्हे शाखेतील कर्मचाऱ्यांकडून सुरू करण्यात आली आहेत. त्यामुळे शहरात कुठलाही गुन्हा घडला तर एका क्लिकवर पोलिसांना गुन्हेगारांची संपूर्ण माहिती मिळणार आहे.

चोरी, घरफोडी, हत्या, हल्ला, बलात्कार, प्राणघातक विनयभंग, पोक्सो, महिला छेडखानी, फसवणूक, हाणामारी, लुटमार, दरोडा, चेन्सनेंचर, दुचाकी व कार चोरी अशा वेगवेगळ्या गुन्हेगारांची सखोल माहिती ऑनलाईन अपडेट करणे सुरू आहे. तसेच ज्या गुन्हेगारांचा मृत्यू झाला अशा गुन्हेगारांचे नाव या यादीतून कमी केले जाणार असून महिला गुन्हेगारांची माहितीसुध्दा याच पध्दतीने अपडेट केली जात आहे.

# सांस्कृतिक समर्पणातून गुरू स्मृतीस मानवंदना नृत्य, संगीताने रंगला अमरावतीचा सांज




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

स्व. गुरू श्री नरसिंग गोपन्ना बोडे व स्व. गुरू श्री रमेश गोपन्ना बोडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ एक भव्य नृत्य-संगीत समर्पण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा सांस्कृतिक कार्यक्रम १० सप्टेंबर २०२५, बुधवार रोजी सायंकाळी ६ वाजता संत ज्ञानेश्वर सभागृह, अमरावती येथे संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन अमरावती जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते करण्यात आले असून, प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या हितचिंतक व माजी लेडी गव्हर्नर सौ. कमलताई गवई, तसेच अमरावतीचे खासदार बळवंत वानखेडे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमात संस्थेतील लहानग्यांपासून ज्येष्ठ विद्यार्थ्यांपर्यंत सर्वजण गायन, वादन व शास्त्रीय नृत्याच्या माध्यमातून गुरूंना आदरांजली अर्पण केली. यावेळी पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची कला यांचा समन्वय यामध्ये ठळकपणे दिसून आला.

यामरावती शहरातील रसिक प्रेक्षकांनी या संगीत-नृत्य महोत्सवाचा मनसोक्त आनंद घेत कलाकारांना प्रोत्साहन दिले.



# जिल्ह्यात ईराणी टोळी पुन्हा सक्रीय; चार महिलांचे दागिने लंपास वृद्ध महिला, पुरुष लक्ष्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

: जिल्ह्यात ईराणी टोळी सक्रिय झाली असून तोतया पोलीस असल्याची बतावणी करून त्यांनी दोन दिवसाच जिल्ह्यातील चार महिलांच्या गळ्यातील लाखो रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास केले आहेत. ही टोळी विशेषतः वृद्ध महिला-पुरुषांना टार्गेट करताना दिसत आहे.

अमरावती शहरासह जिल्ह्यात मागील ३ ते ४ दिवसांपासून ईराणी टोळी सक्रिय झाली आहे. ईराणी टोळीच्या सदस्याचा शोध पोलीस युध्दस्तरावर घेत आहेत. शहरासह जिल्ह्यातील चारही घटनांमधील चोरट्यांची गुन्हे करण्याची पद्धत सम बन आहे. प्रथम त्यांनी मंगरुळ दस्तगीर आणि वरूड येथील दोन महिलांना पोलीस असल्याची बतावणी करून त्यांच्याकडील दागिने लुटले. त्यानंतर मंगळवारी मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या दोन महिलांच्या अंगावरील सोन्याचे दागिने लंपास केले. पहिली घटना डॉ. अजय डफळे यांच्या रुग्णालयासमोर तर दुसरी घटना के. एल. कॉलजसमोर घडली. तेथून जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील २ लाखांचे दागिने लंपास केले आणि जिल्ह्यातून निघून गेले. पोलिसांनी दोन्ही घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. त्यावरून लुटारू ईराणी टोळीतील असल्याचे स्पष्ट झाले. पुणे, अकोला, औरंगाबाद, मुंबई अशा अन्य ठिकाणच्या ईराणी टोळीच्या म्होरक्यांचा पोलिसांनी मागोवा घेतला. ठोस माहितीवरून पोलीस त्यांच्या मार्गावर आहेत.


# काळे प्रकरणावर लवकरच शिक्कामोर्तब? निर्णय दोन दिवसांत होण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

जिल्हा बँकेचे संचालक आनंद काळे यांच्या अपात्रते प्रकरणात बुधवारी सुनावणी पार पडली. उच्च न्यायालयाकडून दिलेल्या निर्णयानूसार आनंद काळे यांनी मागील सुनावणीत आक्षेप दाखल केले होते. या आक्षेपांवर उत्तराकरिता झालेल्या सुनावणीत विभागीय सहनिबंधकांनी सदर प्रकरण निर्णयाकरिता क्लोज केले असून या निर्णयाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

संचालक आंनद काळे यांच्या विरोधात आर्थिक अनियमिततासह विविध प्रकरणांमध्ये आरोप करीत विरोधकांनी

सहनिबंधकांकडे तक्रार दिली होती. या तक्रारीवरुन विभागीय सहनिबंधकांनी बच्चू कडू गटातील संचालक आनंद काळे यांना अपात्रतेबाबत नोटिस बजाविली होती. त्यानंतर आनंद काळे त्यांनी याप्रकरणी १९ ऑगस्ट



रोजीउच्च न्यायालयात धाव घेतल्यानंतर २०ऑगस्टला न्या.पी.एस.कुबळकर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी त्यांना ३० दिवसांचा दिलासा देण्यात आला आहे. यामध्ये १० दिवसात विभागीय सहनिबंधकांकडे आक्षेप दाखल करणे, १० दिवस उत्तर देण्याचे व त्यानंतर काळे यांच्या विरोधात निकाल लागला तर १०

दिवस निकालाची अंमलबजावणी करिता देण्यात आले. त्या अनुषंगाने विभागीय सहनिबंधकांकडे सुनावणी पार पडली. या सुनावणीदरम्यान न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे आनंद काळे यांनी आक्षेप दाखल करण्याची संधी देण्यात आली होती. काळे यांनी आक्षेप दाखल केल्यानंतर ४ सप्टेंबर रोजी यावर सुनावणी पार पडली. यावेळी बुधवार, १० सप्टेंबरची तारीख देण्यात आली होती. बुधवारी तब्बल दोन ते अडीच तास सुनावणी चालली. त्यानंतर सदर प्रकरण विभागीय सहनिबंधकांनी पुढील निर्णयाकरिता क्लोज केले आहे.

# चंद्रभागा नदीत पाय घसरून एक व्यक्ती गेला वाहून

## दर्यापूरच्या आशा मनीषा माता मंदिराजवळील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ दर्यापूर**

चंद्रभागा नदीत पाय घसरून एक व्यक्ती वाहून गेल्याची घटना मंगळवारी सायंकाळी घडली. रमेश दहीहांडेकर, वय ५५ रा. इंदिरानगर, दर्यापूर असे वाहून जाणाऱ्या व्यक्तीचे नाव असून, गणपती विसर्जन सुरू असताना ते पाहण्याकरिता आशा मनीषा माता मंदिराजवळ चांदभागा नदी काठावर ते उभे होते. नदीत पाय घसरल्याने ते वाहत गेले. एकाव्यक्तीने त्यांना वाचवण्यासाठी पाण्याचा प्रवाह वेगात असल्याने त्या चंद्रभागा नदीत उडीही घेतली. परंतु, व्यक्तीला रमेश दहीहांडेकर यांना वाचवणे शक्य झाले नाही. बुधवारी दहीहांडेकर यांच्या मुलाने पोलिसांत तक्रार दाखल केली. संबंधित तलाठ्यांनी घटनास्थळी पाहणी करून घटनेचा पंचनामा केला. घराजवळील नागरिक नातेवाईकांकडून बुधवारी दिवसभर नदीकाठावर शोध मोहीम सुरू होती.

# गणेशोत्सव आरोग्यवर्धिनी : जिल्ह्यात १६ हजार नागरिकांची मोफत तपासणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अमरावती जिल्ह्यात ३०८ ठिकाणी आरोग्य शिबिरे घेण्यात आली. या शिबिरांमधून १६ हजार ६२१ जणांची तपासणी करण्यात आली असून ५८३ जणांनी रक्तदान केले.



यावर्षीच्या गणेशोत्सवाला शासनाने राज्योत्सवाचा दर्जा देत 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रम राबविण्याचे ठरविले होते. त्यानुषंगाने अनेक मंडळांनी आरोग्य तपासणी शिबीरे आणि रक्तदान शिबिरांचे आयोजन केले होते. त्यानुसार जिल्ह्यात ३०८ ठिकाणी आरोग्य तपासणी तर काही मंडळांनी याच शिबिरांना जोडून रक्तदान शिबिरांचे आयोजन केले होते. प्रशासकीय यंत्रणेमार्फत गोळा करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार आरोग्य तपासणी शिबिरांतून १६ हजार २१९ नागरिकांना आरोग्य तपासणी व उपचाराचा लाभ मिळाला. यामध्ये ७ हजार ९१५ पुरुष, ७ हजार ३८० महिला व ९२४ बालकांचा समावेश आहे.

'श्रीगणेशा आरोग्याचा' या विशेष उपक्रमाला मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षासोबत जोडण्यात आले होते. त्यामुळे दुर्धर आजार असलेल्यांना यापुढच्या उपचारांसाठी आर्थिक सहाय्यसुद्धा केले जाणार आहे. श्रीगणेशा आरोग्याचा अंतर्गत शहरी व ग्रामीण भागातील गणेश मंडळांच्या ठिकाणीच आरोग्य तपासणी व उपचार शिबिरे घेण्यात आली. त्यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनात निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, अधीक्षक डॉ. निलेश खटके, धर्मदाय सहआयुक्त दीपक खोचे, धर्मदाय उपायुक्त राजेश इंगोले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले, सुपरस्पेशालिटी हॉस्पीटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे, महापालिका वैद्यकीय अधिकारी डॉ. विशाल काळे तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे अध्यक्ष डॉ. श्याम गावंडे, पवन गुल्हाने व मंगेश बांबटकर यांनी सक्रीय मदत केली.

**१३० मंडळांमध्ये जनजागृती शिबिरे**

शासनाच्या आवाहनानुसार जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्थांनी आरोग्य विषयक जनजागृतीसाठीदेखील सहभाग नोंदवला. 'अनुलोम' संस्थेने जिल्ह्यातील १४ तालुक्यातील ग्रामीण भागात १३० गणेशोत्सव मंडळांना भेट देऊन ९ हजार १०० नागरिकांमध्ये आरोग्य विषयक जनजागृती केली.

# जनतेची थट्टा! सुट्टी संपली तरी पंचायत समिती कार्यालयात हजेरी नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अंजनगाव सुर्जी**

आठवड्याच्या पहिल्या दिवशी (सोमवारी) कार्यालयात उपस्थित राहणे क्रमप्राप्त असतानाही अंजनगाव सुर्जी पंचायत समिती कार्यालयात अधिकारी-कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती होती. या अनुपस्थितीमुळे सामान्यांना आल्या पावलीच परत जावे लागले. विशेष म्हणजे, सोमवारपूर्वी सलग तीन दिवस सर्व शासकीय कार्यालयांना सुटी होती. परंतु तरीही अधिकारी-कर्मचारी वेळेवर कार्यालयात पोहोचले नाहीत.

शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांची लेटलतिफी नित्याचीच बाब झाली आहे. परंतु लागोपाठ तीन दिवस सुट्टी मिळाल्यानंतरही अधिकारी-कर्मचारी कामावर येत नसतील तर काय म्हणावे, असा प्रश्न त्यामुळेच निर्माण झाला आहे. सदर प्रतिनिधीने सोमवारी दुपारी १२ वाजून १० मिनिटांनी पंचायत समिती कार्यालयात प्रवेश केला. यावेळी प्रभारी गटविकास अधिकाऱ्यासह बहुतेक विभागांचे प्रमुख



**चौकशी करणार**

मी कार्यालयीन कामकाजाच्या निमित्ताने दोन दिवस अमरावती येथे होते. परत आल्यावर या तक्रारीची चौकशी करेन. त्यानंतरच मला या विषयावर बोलता येईल.

**कल्पना जायभाये,**
**प्रभारी गट विकास अधिकारी, पंचायत समिती अंजनगाव सुर्जी.**

अधिकारी अनुपस्थित होते. दरम्यान यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने या भागाचे आमदार गजानन लवटे आणि वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे तक्रार नोंदवण्यात आली आहे.

पंचायत समिती कार्यालय हे तालुका स्तरावरील महत्वाचे कार्यालय आहे. ग्रामीण भागाशी संबंधित कामकाज याच कार्यालयातून पुढे जाते. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांची येथे नेहमी ये-जा असते. एकतर मध्येच येणाऱ्या सुट्यांमुळे ते आधीच कंटाळलेले असतात. त्यात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशीही अधिकारी-कर्मचारी न भेटल्यास त्यांचा त्रागा आणखीणच वाढतो. त्यामुळे संबंधितांना शिस्त पाळण्यास सांगावे, अशी मागणी डॉ. आंबेडकर प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आली आहे. प्रतिष्ठानचे पदाधिकारी तेजस अभ्यंकर, सुनील राक्षसकर, सोमेश इंगळे,जानी भाई, राजु इंगळे व इतर कार्यकर्त्यांनी ही मागणी केली आहे.

# विश्रोळी परिसरात बिबट्याची दहशत

## पूर्णा प्रकल्प परिसरात तीन- चार दिवसांपासून वावर; कॅमेऱ्यात कैद



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११चांदुर बाजार**

विश्रोळी येथील पूर्णा प्रकल्पाच्या परिसरामध्ये बिबट्याचा वावर असल्याचे पूर्णा मध्यम प्रकल्पाच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. असे येथील अधिकाऱ्यांनी सांगितले. बिबट्याचा या परिसरामध्ये चार-पाच दिवसांपासून वावरत असल्याने या परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सातपुड्याच्या पायथ्याशी पूर्णा मध्यम प्रकल्प असून, या परिसरात चार-पाच दिवसापासून बिबट्या आपल्या दोन पिल्यासह वावरात असल्याचे नागरिकांनाही दिसून आले आहे. याची सूचना आमदार प्रवीण तायडे यांच्यामार्फत स्थानिकनागरिकांनी वन विभागाला दिली आहे. सुरुवातीला चार-पाच दिवसापूर्वी पूर्णा प्रकल्पाला लागून असलेल्या जुन्या तलावाच्या जवळ असणाऱ्या विश्रोळी येथील शेतकरी मिनाजी देशमुख यांच्या शेतात बिबट्याचे पायाचे चिन्ह दिसून आले

होते. त्याचा पंचनामा सुद्धा का विभागाने केला आहे. त्यानंतर पूर्णा मध्यम प्रकल्प स्थळी ८ सप्टेंबरला रोजी रात्री साडेसहा वाजता नियंत्रण कक्षा जवळच्या पार्किंग मध्ये कार्यरत कर्मचारी व सुरक्षा रक्षक यांना बिबट्या निर्दशनास आला. बिबट्याच्या हालचाली सीसीटीव्हीत कैद झाले आहे. ९ सप्टेंबरला पुनश्च नियंत्रण कक्षाच्या मागील बाजुस बिबट्या निर्दशनास आला आहे. याची माहिती पूर्णा मध्यम प्रकल्प विभागाने, वन विभागाला दिली. शेतकरी व मजूर वर्गात बिबट्याची दहशत निर्माण झाली. या भागात सीताफळांचे बन

**पर्यटकांनी खबरदारी घ्यावी**

पूर्णा मध्यम प्रकल्पाच्या परिसरामध्ये बिबट्या निर्दर्शनास आला आहे. तरी पुर्णा मध्यम प्रकल्पाला भेट देणाऱ्या पर्यटकांनी खबरदारी घेण्यात यावी. शक्यतो कुणीही एकटे जाऊ नये.

**अनुप खवणे,**
**उपविभागीय अभियंता तथा धरण प्रमुख, पुर्णा मध्यम प्रकल्प.**

असून व्यावसायिक या बिबट्यामुळे धास्तावले आहे. त्यामुळे दिक्सा शेतात जायचे झाल्यास चार-पाच व्यक्ती सोबत जात आहे. याची - माहिती वन विभागाला - दिल्यानंतरही वनविभागाने ठोस भूमिका घेतली नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

# तहसीलच्या डेपोत रेतीचे डंबर किती दिवस उभे राहणार? - नागरिकांचा सवाल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ वरूड**

तहसील कार्यालयाच्या आवारात जप्त केलेल्या रेतीच्या गाड्या, डंपर व ट्रक यांचा दिवसेंदिवस मोठा जमाव वाढत चालला आहे. रेतीच्या अवैध वाहतुकीवर कारवाई केल्यानंतर हे वाहनं जप्त करून तहसील कार्यालयाच्या आवारात उभी केली जातात. परंतु या वाहनांमुळे कार्यालयात येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.कार्यालयीन कामकाजासाठी येणाऱ्या शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक यांना या जप्त वाहनांमुळे अडथळे निर्माण होत आहेत. आवारात जागेअभावी वाहनांची गर्दी वाढल्याने अपघाताची शक्यताही नाकारता येत नाही. रेतीचे डंपर अनेक दिवस तशाच उभ्या असल्यामुळे धूळ, घाण व दुर्गंधी पसरून नागरिक त्रस्त झाले आहेत, ही वाहने व रेतीचे डंपर अखेर कधी काढण्यात येणार? तहसील कार्यालय हे लोकांच्या कामकाजाचे ठिकाण आहे की जप्त वाहनांचे डेपो? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.तहसील प्रशासनाने नियमाप्रमाणे या वाहनांवर त्वरित कार्यवाही करावी किंवा वेगळ्या ठिकाणी सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे. अन्यथा नागरिक या विरोधात आंदोलन छेडण्याचा इशारा देत आहेत. लोकांच्या दैनंदिन अडचणींवर कायमस्वरूपी तोडगा निघावा, हीच नागरिकांची अपेक्षा आहे.

# पिण्याच्या पाण्याची चिंता मिटली

## जिल्ह्यातील ५६ प्रकल्पात ८५.०७ टक्के जलसाठा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**



यावर्षी उन्हाळ्यात उन्हाची तीव्रता वाढली होती. त्यामुळे पाण्याचा उपसाही मोठ्या प्रमाणावर झाला. यावर्षी अवकाळी पावसाने हजेरी लावली. तसेच जून महिन्यातही प्रकल्पांची जलपातळी कमीच होती. जुलै, ऑगस्ट महिन्यात झालेल्या पावसामुळे तसेच मागील चार पाच दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाने जिल्ह्यातील ५६ प्रकल्पातील पाणीसाठा हा (८९०, ९७ दलघमी) म्हणजेच ८५८०७ टक्क्यांवर पोहोचला आहे. दरम्यान सर्वात मोठ्या अप्पर वर्षा धरणाचा जलसाठा हा ९६.७५ टक्क्यांवर पोहोचला आहे. या घरणाचे पाच दारे खुली करण्यात आली आहे. तसेच ७ विकी चार मध्यम प्रकल्पांची जल पातळी वाढल्याने या प्रकल्पांचे दारे खुले करण्यात आली आहे. गतवर्षी जिल्ह्यात झालेल्या संततधार तसेच प्रकल्प क्षेत्रातील पावसामुळे १ मोठा प्रकल्प, ७ मध्यम आणि ४८ लघु अशा ५६ प्रकल्पातील जलसाठ्यात वाढ झाली. तसेच यातील बरेच प्रकल्प ओव्हरफ्लोही झाले होते.यंदा उन्हाळ्याची तीव्रता वाढली होती. बाष्पीभवनामुळे या ५६ प्रकल्पांचा जलसाठा कमी होत गेला. त्यातील ४८ लश प्रकल्पापैकी २७ लघु प्रकल्प कोरडे पडले होते. या प्रकल्पांवर अवलंबून असलेले गावांवर पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली होती. मात्र, मागील महिन्यात झालेल्या पावसाच्या पाण्यामुळे जलसाठ्यात वाढ झाली आहे, सद्य स्थितीत जिल्ह्यातील सर्व ५६ प्रकल्पांमध्ये आजघडीला ८५ टक्क्यांवर जलसाठा आहे. यामध्ये जिल्ह्यातील सर्वात मोठा प्रकल्पअसलेल्या अप्पर वर्धा धरणाचा पाणीसाठा हा (५४५.७० दलघमी) म्हणजेच ९६ ७५ टक्के आहे. तसेच सात मध्यम प्रकल्पात (१६५.३५ दलघमी) ६४.५३ टक्के जलसाठा आहे. तसेच ४८ लघु प्रकल्पात (१७९.९१ दलघमी) अर्थात ७९.२५ टक्के जलसाठा आहे. तसेच ४ मध्यम प्रकल्पांची पाणीपातळी वाढल्याने त्यांचीही दारे पाण्याची पातळी बघुन उघडण्यात आली आहे. यामध्ये शहापुर, चंद्रभागा,पूर्णा, सापन,या प्रकल्पाचा समावेश आहे.

# श्री क्षेत्र भारवाडी येथे सत्यदेव बाबा यांची ४३ वी पुण्यतिथी साजरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ तिवसा**

अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यातील श्री क्षेत्र भारवाडी येथे परमहंस श्री सत्यदेव बाबा यांची ४३ वी पुण्यतिथी मोठ्या उत्सहात साजरी करण्यात आली.श्री क्षेत्र भारवाडी येथील परमहंस श्री सत्यदेव बाबा यांचा इतिहास असा आहे की.सत्यदेव महाराजाचा जन्म चैत्र शुद्ध चतुर्दशीला झाला आणि त्यांचे नाव चंपक डांगे हे होते.श्री शत्यादेव बाबा यांच्या आईचे नाव तुळसाबाई या श्री क्षेत्र वरखेड येथील श्री समर्थ आडकुजी महाराज यांच्या सेवेत असायच्या.सत्यदेव महाराजांना



१९ वर्षा पर्यंत बोलता येत नव्हते. परंतु आडकुजी महाराजाच्या कृपा प्रसादाने सत्यदेव बोलायला लागले.सत्यदेव महाराज जे बोलायचे ते सत्य व्हायचे म्हणून त्यांना 'सत्यदेव 'म्हणायला सुरवात झाली.सत्यदेव महाराज यांचा अनुभव अनेक भक्तांना आहेत.सत्यदेव महाराज १९८२ साली ब्रम्हलीन झाले.त्यानंतर दरवर्षी प्रमाणे सत्यदेव महाराजांची जयंती व पुण्यतिथी मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते.दि.०३ सप्टेंबर २०२५ ते १० सप्टेंबर २०२५ ह्या कालावधी मध्ये ४३ वी पुण्यतिथी मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आली असून ह्या कालावधी मध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांची मेजवानी पाहायला मिळाली.दि १० सप्टेंबर २०२५ रोजी सत्यदेव महाराज यांचा पुण्यतिथी समारोपीय मोठ्या उत्सहात पार पडला.श्री क्षेत्र भारवाडी येथे विविध ठिकाणच्या पालख्या व दिंड्या दाखल झाल्या होत्या आणि नंतर काल्याचे कीर्तन व अंदाजे १०००० भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.श्री सत्यदेव महाराज संस्थान तर्फे अतिशय शिस्तबद्ध व उत्कृष्ट आयोजन करण्यात आला आले होते.या पुण्यतिथी महोत्सवाला यशस्वी करण्या करिता विश्वस्त मंडळातील सदस्य बाबासाहेब बेनोडकर तसेच गावातील नागरिकांनी अथक परिश्रम घेऊन पुण्यतिथी यशस्वी पार पाडली.

# अमरावती जिल्हा परिषदेत अनुकंपा भरतीतून ९ उमेदवारांची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत अनुकंपा भरती प्रक्रियेअंतर्गत गुरुवार, ११ सप्टेंबर रोजी मा. डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात समुपदेशन प्रक्रिया पार पडली. सुधारित शासन निर्णयानुसार गट-ड मधून गट-क पदांवरील भरतीसाठी ही प्रक्रिया राबवण्यात आली.

या प्रक्रियेसाठी ६२ अनुकंपा धारकांना बोलावण्यात आले होते, ज्यासाठी २३ विविध गट-क पदे उपलब्ध होती. यामध्ये आरोग्य सेवक, कनिष्ठ अभियंता, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, विस्तार अधिकारी अशा विविध पदांचा समावेश होता.

शैक्षणिक पात्रता व जागांच्या उपलब्धतेनुसार ९ उमेदवारांची निवड करण्यात आली. या प्रक्रियेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. संजीता महापात्र यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुदर्शन तुपे आणि इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नियोजनबद्ध काम पाहिले.







# विदर्भाच्या राजाला भावपूर्ण निरोप....



अमरावतीमधील खापर्डे बगिचा येथील न्यू आझाद गणेशोत्सव मंडळाच्यावतीने विदर्भाचा राजा म्हणून ख्याती असलेल्या गणेशाचे गुरुवारी विजर्सन करण्यात आले. शहराचे आकर्षण ठरलेल्या विदर्भाच्या राजाची ढोल ताशांच्या निनादात विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. लेझिम पथके, ढोलपथक, फटाक्यांची आतषबाजी मिरवणुकीचे आकर्षण ठरले. राजकमल चौक येथे महाआरती करण्यात आली या मिरवणुकीत हजारो भाविकांनी सहभागी होऊन विदर्भाच्या राजाला भावपूर्ण निरोप दिला.

## तिवसा/अंजनगाव सुर्जी तहसीलमध्ये चतुर्थ श्रेणी मागणीसाठी महसूल सेवक (कोतवाल) यांचे लक्षवेधी आंदोलन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.११ तिवसा / अंजनगाव सुर्जी**

तिवसा तहसीलमधील विदर्भ महसूल सेवक संघटना (कोतवाल) शाखेच्या वतीने चतुर्थ श्रेणी दर्जा मिळावा या मागणीसाठी एक दिवशीय आंदोलन करण्यात आले. महसूल सेवक (कोतवाल) हे महसूल विभागातील अत्यंत महत्त्वाचे घटक असून शासकीय योजना गावपातळीपर्यंत पोहोचवण्यात त्यांचे योगदान मोठे आहे.

तरीसुद्धा त्यांना अद्याप शासनाच्या वर्गीकृत सेवा सुविधांचा लाभ देण्यात आलेला नाही, ज्यामुळे कोतवालांना अन्याय सहन करावा लागत आहे. त्यामुळे कोतवाल पदास चतुर्थ श्रेणी दर्जा देण्यात यावा, अशी जोरदार मागणी करण्यात आली.

मागण्या मान्य न झाल्यास १२ सप्टेंबरपासून महसूल मंत्री यांच्या कार्यक्षेत्रात बेमुदत काम बंद, धरणे आंदोलन आणि साखळी उपोषण करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. या आंदोलनात रवींद्र भारती (तालुका अध्यक्ष), मीनाक्षी महल्ले (उपाध्यक्ष), राजू सपाटे (सचिव) यांच्यासह तालुक्यातील कोतवाल मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## परतीचा मान्सून १६ ते १८ सप्टेंबरदरम्यान सुरू होण्याचा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती**

राज्यात यंदा मान्सूनपूर्व धुव्वाधार पाऊस झाला. त्यानंतर राज्यात मान्सून दाखल झाला आणि आठवडाभर मध्यम ते जोरदार बरसल्यावर पावसाने विश्रांती घेतली. मागील तीन महिन्यात खंड पडत पाऊस कमी-अधिक झाला. सप्टेंबर महिन्यातही पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी आल्या. मागील दोन-तीन दिवसांपासून पावसाचा जोर ओसरला आहे. मात्र आता हवामान विभागाने १६ ते १८ सप्टेंबरदरम्यान परतीचा मान्सून सुरू होण्याचा अंदाज वर्तविला आहे. त्यामुळे पुढील आठवड्यात राज्यात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे.

हवामान विभागाने परतीचा मान्सून १६ ते १८ सप्टेंबरदरम्यान सुरू होण्याचा अंदाज वर्तविला आहे. महत्त्वाचे म्हणजे परतीच्या मान्सूनच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शेतकरी सध्या खरीप हंगामातील पिकांच्या शेवटच्या टप्प्यातील कामकाजात गुंतलेले आहेत. कारण मागे झालेल्या पावसामुळे काही भागात शेतीच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. कित्येक हेक्टर पिके पावसाच्या पाण्यात वाहून गेली असून पावसाचा सर्वाधिक फटका नांदेड जिल्हात बसलाय आहे. त्यामुळे त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी आता परतीच्या पावसाची आतुरतेने वाट पाहत आहेत. कारण रब्बी हंगामासाठी आवश्यक आर्द्रता व मातीतील ओल राखण्यासाठी परतीच्या पावसावरच शेतकर्यांची मदार असणार आहे. जर अपेक्षेप्रमाणे पाऊस झाला तर गहू, हरभरा आणि ज्वारीसारख्या पिकांची लागवड वेळेवर होईल आणि उत्पादनात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांवर परतीच्या पावसाची कृपादृष्टी होणार का? हे पाहावे लागेल.

## उबाठा उपद्रवच करणार! - ठाकरे गटावर अनिल बोंडे यांचा घणाघात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती**



आशिया कपमध्ये भारत-पाकिस्तान क्रिकेट सामन्यावरून आंदोलन करणाऱ्या ठाकरे गटावर भाजपचे ज्येष्ठ नेते आणि आमदार अनिल बोंडे यांनी जोरदार टीका केली आहे. उबाठा उपद्रव करणारच आहे, पण सुप्रीम कोर्ट काय म्हणतं हे लक्षात घेणं गरजेचं आहे, अशा शब्दांत त्यांनी टीका सुरू केली.

ठाकरे गटाच्या आंदोलनाला फटकारताना बोंडे म्हणाले, जर उपद्रवच करायचा असेल, तर देशाच्या सीमारेषेवर जाऊन करा. हा थेट भारत-पाकिस्तान सामना नाही, हा आशिया कप आहे. त्यात पाकिस्तान आला, तर तो सामना खेळावाच लागणार.


पुढे बोलताना त्यांनी काँग्रेसवरही हल्ला चढवला. उबाठा ज्या काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसतो, त्या काँग्रेसने पाकिस्तानच्या विरोधात कधी ठोस पाऊल उचललं नाही. २६/११ च्या हल्ल्यात दीडशे नागरिक मारले गेले, तरी केवळ निषेध करण्यात आला.

डॉ. बोंडे यांनी ठामपणे सांगितलं की, अशा वेळी देशाच्या पंतप्रधानांच्या मागे ठामपणे उभं राहणं ही प्रत्येक देशभक्त नागरिकाची जबाबदारी आहे. राजकारणासाठी देशहिताशी खेळणं योग्य नाही.

भाजप नेत्याच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, ठाकरे गटाकडून यावर काय प्रत्युत्तर येते, याकडे सगळ्यांचं लक्ष लागून आहे.

## मेळघाटातील आदिवासी नागरिकांसाठी विकास यात्रा राबविणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि. ११ अमरावती**




मेळघाटातील आदिवासी नागरिकांचे जीवनमान उंचावणे, रोजगार वृद्धी, पिण्याच्या शुद्ध पाण्याची सोय आणि सक्षमीकरणासाठी जिल्हा परिषद अमरावती आणि ICICI बँकेच्या सहकार्याने विकास यात्रा हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. मेळघाटातील निवडक गावांमध्ये हा उपक्रम राबवून त्याठिकाणी आर्थिक मदत आणि विविध योजनांद्वारे विकासाला गती देण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहेत.

या योजनेअंतर्गत Financial Partner म्हणून ICICI बँकेकडून आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. पंचायत समिती स्तरावरील यंत्रणा, कृषी विभाग, वन विभाग, माविम आणि एकात्मिक आदिवासी प्रकल्प अधिकारी कार्यालय यांच्या मार्गदर्शनाखाली विकास यात्रा प्रभावीपणे राबविण्यात येईल.


या उपक्रमासंदर्भात ICICI बँकेच्या प्रतिनिधींनी PPT सादरीकरण केले. या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र,ICICI बँकेचे समन्वयक सुजीतकुमार, पंचायत समितीचे बीडीओ आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

या उपक्रमामुळे मेळघाटातील आदिवासी भागात आर्थिक विकासासह शिक्षण, आरोग्य व रोजगार सुविधा यामध्ये सुधारणा घडून आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.

## जिल्ह्यातील १५०० कृषी केंद्रे सोमवारी राहणार बंद

### ‘साथी पोर्टल’ विरोधात केंद्रधारकांचा एकमुखी निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती**



राज्य सरकारने बियाणे विक्रीसाठी सक्तीने लागू केलेल्या साथी पोर्टल विरोधात जिल्ह्यातील कृषी केंद्रधारकांनी जिल्ह्यातील सर्व कृषी केंद्रे १५ सप्टेंबरला एक दिवस बंद ठेवण्याचा निर्णय घेर्तेला असून, त्यानंतरच्या आंदोलनाची, दिशा राज्यस्तरीय बैठकीत निश्चित करणार असल्याची माहिती अमरावती जिल्हा अध्यक्ष मिलिंद इंगोले यांनी दिली.

केंद्र व राज्य सरकारने ग्रामीण भागातील प्रत्यक्ष परिस्थितीचा विचार न करता साथी पोर्टल लागू केले आहे. ग्रामीण भागात अजूनही वीज व इंटरनेटसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत, अशा परिस्थितीत शेतकरी व कृषी केंद्रधारकांना ऑनलाइन व्यवहार करण्यास भाग पाडणे हा अन्याय असल्याचा आरोप करीत कृषी केंद्र संचालकांकडून आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. कृषी केंद्र संचालकांनुसार ग्रामीण भागातील ७० टक्के कृषी विक्रेत्यांकडे कॉम्प्युटर व इंटरनेटची सोय नाही, विजेची सततची समस्या असल्याने ऑनलाईन व्यवहार ठप्प होणार. ब्रिडर बीज व बीजोत्पादन करणाऱ्या कंपन्यांवर नियंत्रण नाही, मात्र कृषी केंद्रांवर अनेक बंधने आहेत. लहान व मध्यम कृषी केंद्रांची रोजीरोटी धोक्यात असून पोर्टलवरील तांत्रिक बिघाडामुळे शेतकऱ्यांना तातडीच्या गरजेच्या वेळी बी-बियाणे व खते उपलब्ध होणार नाहीत. त्यांची गैरसोय होईल. यासर्व बाबी लक्षात घेता साथी पोर्टल तातडीने मागे घ्यावे, ग्रामीण व शहरी भागातील वास्तव परिस्थिती पाहून विद्यमान विक्री पद्धती कायम ठेवावी व शेतकरी व कृषी केंद्रधारकांचा प्रतिनिधी मंडळ बोलावून चर्चेनंतर निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

अमरावती जिल्ह्यातील १५०० हून अधिक कृषी केंद्रधारक एकदिलाने या आंदोलनात सहभागी झालेले आहेत. हा लढा शेतकरी व कृषी केंद्रधारकांच्या अस्तित्वाचा असून, सरकारने हा निर्णय तातडीने मागे घेतला नाही तर अमरावती जिल्हा अधिक कठोर आंदोलनात्मक भूमिका घेईल.अशी माहिती मिलिंद इंगोले, जिल्हाध्यक्ष, अमरावती यांनी दिली.

**रस्त्यावर उतरून आंदोलनाचा इशारा**

कृषी सेवा केंद्र चालकांकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार १५ सप्टेंबर रोजी जिल्ह्यातील सर्व कृषी केंद्रे पूर्णपणे बंद ठेवली जातील. त्यानंतर १७ - १८ सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय बैठकीत पुढील आंदोलनाचा निर्णय घेण्यात येईल. आवश्यकता भासल्यास अनिश्चितकालीन बंद व रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशाराही कृषी केंद्रधारक संघटनेकडून देण्यात आला आहे.

## महिला महाविद्यालयात गुरुप्रतिष्ठा महोत्सवाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११ अमरावती**

स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळ द्वारा संचालित महिला महाविद्यालयामध्ये शनिवार दि. १३ सप्टेंबर रोजी शिक्षकदिनाच्या निमित्ताने कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सन्मानार्थ 'गुरुप्रतिष्ठा महोत्सवाचे' आयोजन करण्यात येत आहे. यासर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी महाविद्यालयाच्या विकासामध्ये आपले अमूल्य योगदान दिलेले आहे. या ज्येष्ठ व्यक्तींच्या ज्ञानाचा, अनुभवाचा लाभ महाविद्यालयाला होतो आणि त्यांचे मार्गदर्शन विद्यार्थिनींना कायम लाभत असते. त्यामुळे त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करणे व त्यांच्याशी असलेले महाविद्यालयाचे ऋणानुबंध अधिक घट्ट व्हावे हा या कार्यक्रमाच्या आयोजनामागील उद्देश आहे. या सत्कार सोहळ्याला महाविद्यालयाच्या कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित रहावे अशी विनंती या कार्यक्रमाकरिता गठित संवाद समितीच्या प्रमुख प्रा. डॉ. मंजुषा धापुडकर तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अरुणा वाडेकर यांनी केले आहे.

## कापूसतळणी गणपती विसर्जनातील डीजे वर कारवाई

### डीजे वाहनअंजनगाव पोलीस स्टेशने ने घेतले ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील कापूसतळणी येथील गणपती विसर्जनात वेळेचे पालन न केल्याने ,डि.जे.चे वाहणामुळे नागरीकांचे घराचे नुकसान केल्याने मंडळाचे कार्यकर्ते व डी.जे .वाहनावर कारवाई करुण डीजे ताब्यात घेण्यात आला.

कापुसतळणी येथील नारायणपूर हा भाग अंजनगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत येत असून. दि.०८ रोजी गणपती विसर्जन साठी रहिमापूर पोलीस स्टेशनचे कर्मचाऱ्यांनी गणेश मंडळाचे पदाधीकार्य़ांना वेळेचे भान ठेवून वेळेवर गणपती विसर्जन करण्यासाठी वारंवार सूचना केल्या. परंतु डीजे वाहन क्रमांक एम एच.३०.एबी ३२९४ उशिरा आल्याने मिरवणुक निघण्यास वेळ झाला.तसेच डीजे वाहण मोठे असल्याने नेहमीचा मार्गावरुन गणपती नेने अडचणीचे होत असताना




पोलीसांचे सुचनाकडे मंडळाचे अध्यक्ष, सदस्य यांनी दुर्लक्ष केले. डीजेचे वाहन नुरानीपुरा या मुस्लिम वस्तीच्या गल्लीतून जाणार नाही याबाबत सांगितले असताना सुद्धा डीजेचे वाहन त्याच गल्लीत घातल्याने डीजेच्या वाहणामुळे अब्दुल मौफीक अब्दुल रशीद यांच्या घराचे नुकसान झाले यावेळी काही काळ तणाव निर्माण झाला होता.पोलीसांनी या बाबीची गंभीर दखल घेत मंडळाचे अध्यक्ष नितीन सेवाने ,उपाध्यक्ष अनिल फरकुंडे व सदस्य ज्ञानेश्वर पोकळे ,सुनील खडसे अंकुश सेवाणे, सदिंप सेवाणे, डीजे चालक मालक दीपक गुप्ता (मूर्तीजापुर) यांच्या विरुद्ध जिल्हाधिकारी अमरावती यांच्या कलम ३७(१)(३)महा.पोका काढलेल्या आदेशाचे गणपती मंडळाचे पदाधिकारी व डीजे गाडी चालक यांनी उल्लंघन करून गावात सार्वजनिक शांतता भंग केल्याने अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला नारायणपूर हनुमान गणेश मंडळ अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्या विरुद्ध कलम २२३,२८१, ३२४,(२) बी. एन. एस२०२३ सहकल्म ३३,१३१,१३५, महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१सह कलम ५२मोटार वाहन कायदा १९८८ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात येऊन डीजे ताब्यात घेण्यात आला.

## सहकार नेते अण्णाजी दिवे यांनी घेतला अखेरचा श्वास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११तिवसा**



तिवसा तालुक्यातील बहुचर्चित व्यक्तिमत्त्व सहकार नेते शंकरराव उपाख्य अण्णासाहेब दिवे यांचे वयाच्या ८७ या वर्षी अल्प आजाराने निधन झाले.तळेगाव ठाकूर येथील शामरावजी दिवे यांचे पुत्र शंकरराव यांनी इंटरसाईन्सचे शिक्षण घेत असतानाच शेतीची आवड असल्यामुळे त्यांनी वेळेनुसार शेतीकडे लक्ष पुरविले.अशातच सर्वप्रथम १९६७ साली सहकार क्षेत्रात पदार्पण करून सेवा सहकारी सोसायटीवर स्थानबद्ध झाले.१९७२ साली ग्रामपंचायत निवडणूक लढवली १९७७ ते १९८२ पर्यंत कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष पद भूषविले. २००० ते २००९ दरम्यान पुणे येथील कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक पद भूषविले. १९८६ साली जिल्हा मध्यवर्ती बँक अमरावती उपाध्यक्षपदी विराजमान होते.